**खटला क्र. २८९/पीडब्ल्यु/२०२५** **निशाणी क्र. १७५**

साक्षीदार क्र. ९

मी शपथपुर्वक सांगतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | : रंजित शातांराम शिंदे, |
| वय | : ४४ वर्षे, |
| व्यवसाय | : सुरक्षा अधिकारी, औषध विमा कंपनी, |
| पत्ता | : डोंबिवली, जिल्हा ठाणे. |

**सरतपासणी सरकारी वकील श्री. रविंद्र पाटील यांचे तर्फे:—**

१. मी आरोपी प्रज्योत भागवत यास ओळखत नाही. प्रज्योत भागवत याचे नाव मी माझ्या मेहूणा श्री. राहुल मारुती कोरपे याच्या तोंडून ऐकलेले आहेत. राहुल व प्रज्योत हे दोघेही मित्र आहे. मला माझे मेहूणे राहुल कोरपे यांनी ते स्वत: प्रज्योत भागवत याच्यासोबत शेअर मार्केटचा व्यवसाय करत असून शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल असे सांगितले.

२. मी जानेवारी २०२१ पासून राहुल कोरपे यांच्याकडे शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यास सुरवात केली. त्यानंतर मी थोडी थोडी रक्कम राहुल सांगतिल त्याप्रमाणे कधी त्यांच्या किंवा प्रज्योत यांच्या खात्यावर पाठवत असे. माझे व माझ्या पत्नीचे एकत्रित खाते आहे. सदरील दोघांना एकूण ३ खात्यावरुन व्यवहार करण्यात आलेले आहेत. माझे अभ्युदय बॅक शाखा डोंबिवली येथे एकत्रित खाते असून त्याचा खाते क्र. १०४०१११००००२३२३ असा आहे. त्याचप्रमाणे माझ्या पत्नीचे अभ्युदय बॅकेच्या सदरील शाखेमध्ये स्वतंत्र खाते असून त्याचा खाते क्र. १०४०१११००००९०४६ असा आहे. माझे एचडीएफसी बॅक शाखा डोंबिवली येथे स्वतंत्र खाते असून त्याचा खाते क्र. ०२३९११४०११३६२५ असा आहे.

३. अभ्युदय बॅक शाखा डोंबिवली येथील खाते क्र. १०४०१११००००२३२३ यावरुन प्रज्योत भागवत यास दि. ०१.०३.२०२१ पासून

दि. २५.१०.२०२४ या कालावधीत रु. ४,५०,०००/— पाठवण्यात आले होते. परंतु प्रज्योत याने सदरील भरलेल्या रक्कमेचा कुठलाही परतावा केला नव्हता.

४. अभ्युदय बॅक शाखा डोंबिवली येथील खाते क्र. १०४०१११०००००९०४६ यावरुन प्रज्योत भागवत यास दि. ०१.०३.२०२१ पासून दि. २५.१०.२०२४ या कालावधीत रु. ३६,०००/— पाठवण्यात आले होते. त्या खात्यावर मला प्रज्योत भागवत याने रु. २३,९४,०००/— पाठवले होते.

५. एचडीएफसी बॅक शाखा डोंबिवली येथील खाते क्र. ०२३९११४०११३६२५ यावरुन प्रज्योत भागवत यास दि. ०१.०३.२०२१ पासून दि. २५.१०.२०२४ या कालावधीत रु. २७,०००/— पाठवण्यात आले होते. त्या खात्यावर मला प्रज्योत भागवत याने रु. ६,२०,०००/— पाठवले होते.

६. मी राहुल कोरपे यांना अभ्युदय बॅक शाखा डोंबिवली येथे एकत्रित खाते क्र. १०४०१११००००२३२३ यावरुन दि. ०१.०३.२०२१ पासून दि. २५.१०.२०२४ या कालावधीत रक्कम रु. १,४०,०००/— पाठवले होते.

७. एचडीएफसी बॅक शाखा डोंबिवली येथील खाते क्र. ०२३९११४०११३६२५ यावरुन राहुल कोरपे यांना दि. ०१.०३.२०२१ पासून दि. २५.१०.२०२४ या कालावधीत रु. १२,१०,०००/— पाठवले होते. त्याचप्रमाणे रु. १,००,०००/— रोख दिले होते. मी सदरील खात्याचे सर्व खाते उतारे हे कायदयानुसार आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रासहीत दाखल केलेले असून त्यावर त्या व्यवहाराच्या नोंदी आहेत. ते खाते उतारे व प्रमाणपत्र हे अनुक्रमे **नि.क्र. १६९ ते नि.क्र. १७२** वर दाखल आहेत.

**<u>उलटतपास आरोपीकरीता ॲड. अजय वर्मा यांचेतर्फे :—</u>**

८. मी तपासी अधिकारी यांना **नि.क्र. १६९ ते १७२** वर दाखल असलेले उतारे तपासा दरम्यान दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी प्रज्योत भागवत यास मी व्यतिगत कधीही भेटलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे मेहूणे राहुल कोरपे आणि प्रज्योत भागवत हे कोणत्या शेअर मार्केटमध्ये अथवा इतर कोणत्या योजनेमध्ये मी दिलेले पैसे गुंतवायचे याची मला वैयक्तिक माहिती नाही. मी राहुल कोरपे व आरोपी प्रज्योत भागवत यांच्याकडे जी रक्कम गुंतवणूक केल्याबाबत सांगत आहे ती रक्कम त्यांनी कश्याात गुंतवणूक केली होती याबाबतचा कागदोपत्री पुरावा मला दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, राहुल कोरपे यांनी आरोपी प्रज्योत भागवत यास गुंतवणुकसाठी निश्चित किती रक्कम दिली होती याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, अभ्युदय बॅकचा एकत्रित खाते क्रमांक व त्याच बॅकेतील पत्नीच्या नावावरील खाते क्रमांक १०४०१११००००९०४६ याच्या खाते उता—यासोबत बॅकर्स बुक ऑफ इव्हिडन्स ॲक्ट याचे प्रमाणपत्र जोडलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयास बनावट खाते उतारे दाखल केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांच्या सांगण्यावरुन न्यायालयात खोटी साक्ष दिली आहे.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपासः—</u>**

९. काही नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

स्वाक्षरी/—
**(वैभव व. कुलकर्णी)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**५ वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक : ०४/०५/२०२६.**